# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 19/08/2020 (बुधवार)

(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 06 कि. मी अंतरावर मौजा इटगाव शिवार येथे दिनांक 17/03/2019 चे 22.00 वा. दरम्यान आरोपी नामे– जग्गु सनक धुर्वे, वय 45 वर्ष, रा. लहानु दाढे याने त्याची पत्नी मृतक नामे– ममता जग्गु धुर्वे, वय 35 वर्ष हि दुसऱ्या व्यक्ती सोबत बोलते असे म्हणुन तिचा चारित्र्यावर संशय घेवुन तिचा गळा, नाक व तोंड दाबुन जिवानिशी ठार केले. यानंतर आरोपीने पुरावा नष्ट करण्याचा उद्देशाने तिचे प्रेत घटनास्थळावरून औढत आणुन शेतातील पलंगावर आणुन ठेवले व तिचा अंगावरील कपडे फाडले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेषराव गुंडेराव काकडे, वय 52 वर्ष, रा. इटगाव (पोलीस पाटील)यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 302, 201 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री गोहणे मो.क्र. 9689244100 हे करीत आहे.

### अपहार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 15 कि मी अंतरावर मौजा ब्रामहणी शाखा उमरेड येथे आरोपी नामे– श्रीमती निर्मला मधुकर, रा. ब्राम्हणी या लोकसेवक असुन ब्राम्हणी शाखा उमरेड येथे डाकपाल या पदावर कार्यरत आहे. दि. 05/08/2020 चे 11.00 वा. ते दि. 11/09/2020 चे 12.00 वा. सुमारास आरोपीने खातेधारीका कडुन रक्कम स्विकारली व सही शिक्यानीशी पासबुक मध्ये नोंदी करून दिल्या. परंतु रक्कम शाखा कार्यालय खात्यामध्ये जमा न करता व खाते धारकांना न माहीत करता शासकीय कर्तव्यावर असता सरकारी रक्कम एकुण 1,16,500/–रू स्वतः वापरून रक्कमेची अपहार करून शासनाची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप लक्ष्मणराव खाडे(सहायक अधिक्षक डाकघर नागपुर ग्रा), वय 49 वर्ष, रा. प्लॉट नं 76 समर्थ नगरी सोनेगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 409 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक हरिष यंगलवार 9511668478 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा खापरखेडा येथे दिनांक 17/08/2020 चे 23.00 वा. ते 24.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– रामक्रिष्णा सपेतराव धोटे, वय 70 वर्ष, रा. वार्ड नं 6 रोहना हे त्यांचे भारतीय स्टेट बॅकचे खात्या मधुन एटीएम कार्ड चे मार्फतीने एटीएम मशीन मधुन पैसे काढन्यास गेले असता त्यांना एटीएम मशीन मधुन एटीएम कार्ड चे व्दारे पैसे काढता येत नसल्याने त्यांनी पाठीमागे असलेल्या अज्ञात आरोपीला एटीएम मधुन पैसे काढुन दे असे म्हटले. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे कार्ड हातात घेवुन एटीएम मध्ये घालुन फिर्यादी कडुन त्याचा एटीएम कार्ड चा कोड फिर्यादीने स्वतः दाबल्यानंतर आरोपीने "तुमचे कार्ड लॉक झाले पैसे निघनार नाही" असे

म्हणुन फिर्यादीला दुसऱ्याचे एटीएम कार्ड दिले व आरोपीने फिर्यादीचे कार्ड हातचालाकीने आपले जवळ ठेवले. तेव्हा काही वेळाने फिर्यादी आपले घरी गेल्यानंतर फिर्यादीचे मोबाईलवर त्यांचे अकाउंट मधुन एकुण 18,000/– रू निघाल्याचे मॅसेज आल्याने समजले आरोपीने फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी विरुध्द कलम 420, 406 भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ कटरे मो नं 9922420496 हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. रामटेक :– दि. 18/08/2020 चे 20:00 वा. ते 20:15 वा. चे सुमारास 26 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि तिच्या मुलासह अंगणात उभी असता काहीही कारण नसतांना आरोपी नामे– संजय हरिदास धुर्वे, वय 45 वर्ष, रा. काचुरवाही याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 323, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि मिना बारंगे या करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 17/08/2020 चे 11:45 वा. चे सुमारास 36 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि पती पासुन वेगळी एकटी राहत असुन आरोपी नामे– दिवाकर सोनवने, रा. केटीएम कंपनी जवळ कळमेश्वर याने तिचे एकटेपणाचा फायदा घेवून तिच्या सोबत जवळीक साधत होता. पीडितेस हि देवदर्शना करीता घोगली येथे पायदळ जात असता आरोपीने तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यादरम्यान पीडितेने आरोपीला शिवीगाळ केली असता आरापीने तिला शिवीगाळ करून कानावर थापड मारली व तिचा मोबाईल हिसकसवुन स्वतः जवळ ठेवुन घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 323, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ राजेन्द्र पाली 9284354630 हे करीत आहे.

3) पो.स्टे. वेलतुर :– दि. 18/08/2020 चे 11:00 वा. ते 11.30 वा. चे सुमारास 29 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि घरी आराम करीत असतांना आरोपी नामे क्र. 1) राहुल भुसारी व 2) लुकेश खराबे यांनी तिच्या घरी अनाधिकृतपणे प्रवेश करून तिला शिवीगाळ केली. यानंतर आरोपीतांनी तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व तिच्या पतीस अश्लिल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीतांविरुध्द कलम 354, 452, 294, 323, 504, 506 भादंवि. सहकलम 3(1) (xi) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी पोर्णिमा तावरे उमरेड विभाग उमरेड या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर